<u>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १/२०१८**</u>

निशाण क्र. १

फौजदारी प्रक्रिया संहितेमधील प्रकरण २१ प्रमाणे आरोपीची संक्षिप्त संपरिक्षा कणकवली येथील **सलीम अ. जमादार, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कणकवली** यांचे न्यायालयात

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | ०१/०१/२०१८ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | ०२/०१/२०१८ |
| ३. | फिर्याददाराचे नाव, त्याची आई व बापाचे नाव, त्यांचे वय व त्यांचे निवासस्थान इत्यादी. | : | दिलीप शामराव पाटील, पोना ४४७, कणकवली पोलीस ठाणे |
| ४. | आरोपीचे नाव, त्याची आई व बापाचे नाव, त्यांचे वय व त्यांचे निवासस्थान इत्यादी. | : | अशोक काशिनाथ इंगळे, वय ४५ वर्षे, रा.कणकवली तली आळी, ता. कणकवली |

५. गुन्हयाची हकीकत :— तुम्ही दिनांक ०१/०१/२०१८ रोजी १८.३० वाजता मुंबई गोवा महामार्गावर पटवर्धन चौक येथे तुमचे ताब्यातील स्कुटर क्र. एमएच—०७—एएफ—८१२५ मद्यसेवन करुन चालवित असताना मिळून आलात म्हणून तुम्ही मोटार वाहन अधिनियम कलम १८५ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केलात.

वर नमुद घटने दिवशी, वेळी व ठिकाणी तुमचे ताब्यातून नमूद मोटारसायकल तुमचेकडे वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती नसताना चालवित असताना मिळून आलात म्हणून तुम्ही मोटार वाहन अधिनियम कलम ३(१) चे उल्लंघन करुन कलम १८१ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला.

६. आरोपीचे प्रतिकथन —

प्र.क्र.१ : तुम्हाला कागदपत्राच्या नकला मिळाल्या काय?
उत्तर : होय.

प्र.क्र.२ : तुम्हाला आता वाचून व समजावून सांगितलेला आरोप समजला काय?
उत्तर : होय.

प्र.क्र.३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?
उत्तर : होय. मला गुन्हा कबूल आहे.

दिनांक : ०२/०१/२०१८

—————————
आरोपीची सही

समक्ष,

न्यायदंडाधिकारी वर्ग—१,
कणकवली

आरोपीस गुन्हयाबाबतचा तपशील वाचून दाखविला व मराठीत समजावून सांगितला.

दिनांक : ०२/०१/२०१८

न्यायदंडाधिकारी वर्ग—१,
कणकवली

## न्यायनिर्णय

प्रतिकथनातील मजकूर आरोपीस मराठी भाषेत समजावून सांगितला. आरोपीने त्याच्यावरील आरोप स्वखूषीने कबूल केले आहे. आरोपीने स्वखुषीने गुन्हा कबूल केला असल्याने मी आरोपीचे प्रतिकथन स्विकारुन त्याला याद्वारे दोषी ठरवित आहे. शिक्षेबाबत आरोपीस विचारले असता त्याने कमीत कमी शिक्षा दंड करणेची विनंती केली. आरोपीवर असलेल्या गुन्हयाचे स्वरुप विचारात घेता पुढीलप्रमाणे आदेश करणे न्यायोचित होईल असे माझे मत आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ नुसार मोटार वाहन अधिनियम कलम १८५ च्या शिक्षापात्र गुन्हयाकरीता रक्कम रुपये १,०००/— ( रुपये एक हजार फक्त ), मोटार वाहन अधिनियम कलम १८१ च्या शिक्षापात्र गुन्हयाकरीता रुपये ५००/— ( रुपये पाचशे फक्त ) दंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

२. आरोपीने दंड न भरल्यास सर्व गुन्हयाकरीता एकत्रित सात दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते.

( सलीम अ. जमादार )

दिनांक ०२/०१/२०१८

न्यायदंडाधिकारी वर्ग —१, कणकवली.